# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे अंतर्गत

## गट-ड संवर्गातील पदभरतीसाठी जाहिरात क्र. 1 सन 2014

महाराष्ट्र शासनाने धुळे सा.बां.मंडळाला दिलेल्या प्राधिकारानुसार खालील संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी विहीत शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांकडुन स्पर्धात्मक परीक्षेसाठी खाली दिलेल्या संवर्गाकरीता केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा **www.pwddhulecircle.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या **http://www.mahapwd.com** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

❖ **पदभरतीचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक 8/9/2014 (सकाळी 12.00 पासुन ते दिनांक 22/9/2014 (सायंकाळी 5.30 पर्यंत) |
| 2 | ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरल्यानंतर तयार होणाऱ्या चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क स्विकृतीचा अंतीम दिनांक | दिनांक 24/9/2014 |

भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल वगैरे सुचना www.pwddhulecircle.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसुन या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

**रिक्त पदांचा तपशील**

**<u>अ) चौकीदार (गट- ड)</u>**

**वेतन श्रेणी पीबी- रु.4440-7440 (ग्रेड वेतन रु.1300/-)**

**एकुण पदे- 5**

| आरक्षण प्रवर्ग | अपंग (3%) | प्रकल्प ग्रस्त (5%) | माजी सैनिक (15%) | महिला (30%) | खेळाडु (5%) | अंशकालीन (10%) | भुकंपग्रस्त (2%) | समांतर आरक्षणा विरहीत पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अ.जमाती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| वि.जा.अ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| भ.ज.ब | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| भ.ज.क | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| भ.ज.ड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| वि.मा.प्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| इ.मा.व | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| शै.सामा.मागा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| वि.मा.प्रवर्ग-अ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| खुला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| एकुण | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **5** | **5** |

( **टिप** - वरील रिक्त पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ धुळे / सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे यांनी राखून ठेवलेले आहेत. उपरोक्त दर्शविण्यांत आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.)

**<u>ब) कक्षसेवक (गट- ड)</u>**

**वेतन श्रेणी पीबी- रु.4440-7440 (ग्रेड वेतन रु.1300/-)**

**एकुण पदे- 18**

| आरक्षण प्रवर्ग | अपंग (3%) | प्रकल्प ग्रस्त (5%) | माजी सैनिक (15%) | महिला (30%) | खेळाडु (5%) | अंशकालीन (10%) | भुकंपग्रस्त (2%) | समांतर आरक्षणा विरहीत पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.जाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **अ.जमाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 4 |
| **वि.जा.अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| **भ.ज.ब** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **भ.ज.क** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.ड** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्र** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **इ.मा.व** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| **शै.सामा.मागा** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्रवर्ग-अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **खुला** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 8 |
| **एकुण** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **18** | **18** |

( **टिप** - वरील रिक्त पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ धुळे / सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे यांनी राखून ठेवलेले आहेत. उपरोक्त दर्शविण्यांत आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.)

**क) सफाई कामगार (गट- ड)**

**वेतन श्रेणी पीबी- रु.4440-7440 (ग्रेड वेतन रु.1300/-)**

**एकुण पदे- 5**

| **आरक्षण प्रवर्ग** | **अपंग (3%)** | **प्रकल्प ग्रस्त (5%)** | **माजी सैनिक (15%)** | **महिला (30%)** | **खेळाडु (5%)** | **अंशकालीन (10%)** | **भुकंपग्रस्त (2%)** | **समांतर आरक्षणा विरहीत पदे** | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.जाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **अ.जमाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.जा.अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.ब** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.क** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.ड** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्र** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **इ.मा.व** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **शै.सामा.मागा** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्रवर्ग-अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **खुला** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 5 |
| **एकुण** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **5** | **5** |

( **टिप** - वरील रिक्त पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ धुळे / सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे यांनी राखून ठेवलेले आहेत. उपरोक्त दर्शविण्यांत आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.)

**ड) स्वच्छक (गट- ड)**

**वेतन श्रेणी पीबी- रु.4440-7440 (ग्रेड वेतन रु.1300/-)**

**एकुण पदे- 6**

| आरक्षण प्रवर्ग | अपंग (3%) | प्रकल्प ग्रस्त (5%) | माजी सैनिक (15%) | महिला (30%) | खेळाडु (5%) | अंशकालीन (10%) | भुकंपग्रस्त (2%) | समांतर आरक्षणा विरहीत पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.जाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **अ.जमाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.जा.अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **भ.ज.ब** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **भ.ज.क** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.ड** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्र** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **इ.मा.व** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| **शै.सामा.मागा** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्रवर्ग-अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **खुला** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **एकुण** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **6** | **6** |

( **टिप** - वरील रिक्त पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ धुळे / सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे यांनी राखून ठेवलेले आहेत. उपरोक्त दर्शविण्यांत आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.)

**<u>इ) खानसामा (गट- ड)</u>**

**वेतन श्रेणी पीबी- रु.5200-20200 (ग्रेड वेतन रु.1800/-)**

**एकुण पदे- 20**

| आरक्षण प्रवर्ग | अपंग (3%) | प्रकल्प ग्रस्त (5%) | माजी सैनिक (15%) | महिला (30%) | खेळाडु (5%) | अंशकालीन (10%) | भुकंपग्रस्त (2%) | समांतर आरक्षणा विरहीत पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.जाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **अ.जमाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 5 |
| **वि.जा.अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **भ.ज.ब** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **भ.ज.क** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.ड** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्र** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **इ.मा.व** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **शै.सामा.मागा** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्रवर्ग-अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **खुला** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 11 | 11 |
| **एकुण** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **20** | **20** |

( **टिप** - वरील रिक्त पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ धुळे / सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे यांनी राखून ठेवलेले आहेत. उपरोक्त दर्शविण्यांत आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.)

**<u>ई) माळी (गट- ड)</u>**

**वेतन श्रेणी पीबी- रु.4440-7440 (ग्रेड वेतन रु.1300/-)**

**एकुण पदे-** 3

| **आरक्षण प्रवर्ग** | **अपंग** (3%) | **प्रकल्प ग्रस्त** (5%) | **माजी सैनिक** (15%) | **महिला** (30%) | **खेळाडु** (5%) | **अंशकालीन** (10%) | **भुकंपग्रस्त** (2%) | **समांतर आरक्षणा विरहीत पदे** | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.जाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **अ.जमाती** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.जा.अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.ब** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.क** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **भ.ज.ड** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्र** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **इ.मा.व** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **शै.सामा.मागा** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **वि.मा.प्रवर्ग-अ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **खुला** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| **एकुण** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **3** | **3** |

( **टिप** - वरील रिक्त पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ धुळे / सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे यांनी राखून ठेवलेले आहेत. उपरोक्त दर्शविण्यांत आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.)

**<u>शैक्षणिक अर्हता व अनुभव</u>**

खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता / अनुभव 22/09/2014 या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | पदांचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | चौकीदार | इ. 4 थी पास व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक |
| 2 | कक्षसेवक | 1. इ. 7 वी पास व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक<br>2. शारिरीक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक |
| 3 | सफाई कामगार | 1. इ. 4 थी पास व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक<br>2. शारिरीक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक |
| 4 | स्वच्छक | 1. इ. 4 थी पास व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक<br>2. शारिरीक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक |
| 5 | खानसामा | 1. इ. 8 वी पास व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक<br>2. शाकाहारी व मांसाहारी पदार्थ बनविण्याचा उपहारगृहे, खानपान किंवा खानावळी येथील कामाचा 3 वर्षाचा अनुभव |
| 6 | माळी | 1. इ. 4 थी पास व मराठी वाचता लिहीता येणे आवश्यक<br>2. शारिरीक दृष्टया सुदृढ असणे आवश्यक |

- **<u>वयोमर्यादेतील सवलत :-</u>**

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक 22/09/2014 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

1) खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरीता - 33 वर्षे

2) मागासवर्गीय उमेदवार - 38 वर्षे

3) अपंग/प्रकल्पग्रस्त/अपंग माजी सैनिक/भुकंपग्रस्त/स्वतंत्र सैनिक निर्देशित पाल्य/ 1991 चे जनगणना कर्मचारी व 1994 नंतरचे निवडणुक कर्मचारी / शासकीय कर्मचारी - 45 वर्षे

4) खेळाडु 5 वर्ष सवलत (खुला प्रवर्ग 33 + 5, मागासप्रवर्ग 38 + 5)

5) अंशकालीन उमेदवार - 46 वर्षे.

माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ, दिनांक 20 ऑगस्ट, 2010 प्रमाणे राहिल.

**परिक्षेचे स्वरुप**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | परिक्षेसाठीचे गुण | |
|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | एकुण गुण |
| 1 | चौकीदार | 100 | 100 |
| 2 | कक्षसेवक | 100 | 100 |
| 3 | सफाई कामगार | 100 | 100 |
| 4 | स्वच्छक | 100 | 100 |
| 5 | खानसामा | 100 | 100 |
| 6 | माळी | 100 | 100 |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व कार्यक्रम**

1) लेखी परिक्षेची प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असेल. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायींपैकी एकच पर्याय निवडावा. (निगेटिव्ह) नकारात्मक गुणपध्दत (मार्क सिस्टिम) अवलंबली जाणार नाही.
2) चौकीदार, कक्षसेवक, सफाई कामगार, स्वच्छक, खानसामा, माळी या पदासाठी मराठी, अंकगणीत व सामान्य ज्ञान या विषयांची लेखी परिक्षा घेऊन निवड करण्यात येईल.

**पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.**

1) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
2) सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
3) विहीत वयोमर्यादेतील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहीत मार्गाने विहीत मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबतची कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करावी.
4) उमेदवारांनी यापुर्वी या कार्यालयाकडे तसेच रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय / जिल्हा सैनिक कार्यालय /

पुर्नवसन कार्यालय येथे नोंदविले असले तरी सदर भरतीसाठी त्यांना स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

5) या जाहिरातीद्वारे अर्ज मागविणेत आलेल्या पदांच्या एकुण संख्येत / प्रवर्गनिहाय संख्येत / संवर्गनिहाय संख्येत बदल करण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग वर्ग 4 परिमंडळ, धुळे यांना असतील.

**1. अंतिम निवड**

1) पात्र उमेदवारांच्या अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.

अ) उमेदवारांची अंतिम निवड हि लेखी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण** मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

1. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर,

2. मागासवर्ग उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागासप्रवर्ग, विमुक्त जाती (14 व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी -1990 - पुर्वीच्या 28 तत्सम जाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने; त्यानंतर,

3. शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले उमेदवार त्यानंतर,

4. माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर,

5. स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार त्यानंतर,

6. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

2) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व मुळ कागदपत्रे व शासन निर्णयाच्या अटीची संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यामार्फत (संबंधीत मंडळ अधीक्षक अभियंता) तपासणी करुन पुर्तता झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

**<u>नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी</u>**

1) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपुर्ण भरुन विहीत परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परिक्षाकेंद्र / बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरतीप्रकीये दरम्यान वेळोवेळी भेट देवुन भरती प्रक्रियेतची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेणेची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.
2) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.
3) निवडीच्या कोणत्याही टप्पयावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्त नंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभुल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवंलब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन वगळण्यात येईल व नियुक्त झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवुन त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
4) उमेदवारास लेखी परिक्षा व कागदपत्र पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.
5) उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असेल तरी त्यांनी या पदांच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहीत शुल्कासहित ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.
6) उमेदवारास कार्बनलेस स्वरुपाची उत्तरपत्रिका परिक्षेच्या दिवशी देण्यात येणार आहे. उत्तरपत्रिकेची प्रत परिक्षा कालावधी संपलेवर परिक्षार्थीने हस्तगत करावी.

7) संकेत स्थळावरुन उत्तरतालिका परिक्षा झालेल्या दिवसापासुन 5 दिवसात प्रसिध्द केली जाईल. जेणेकरुन उमेदवारास स्वत:चे गुण काढता येतील.

8) उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांचे ओ.एम.आर.स्कॅनिगद्वारे प्राप्त गुण वैयक्तिक रित्या पडताळता येण्याची सुविधा उक्त संकेतस्थळावर परिक्षेनंतर 15 दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल.

9) लेखी परिक्षेचे प्रात्यक्षिक परिक्षेचे ठिकाण, वेळ दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत:डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

10) उमेदवाराची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्र पुर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, धुळे / सदस्य सचिव तथा उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे राखुन ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**ऑनलाईन अर्जकरण्याची पद्धत**

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त **<u>www.pwddhulecircle.com</u>** या अधिकृत संकेतस्थळावरुन विहीत पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेलेच अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना,

संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

2) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना **www.pwddhulecircle.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपुर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया बँकत फी भरण्याचे चलन 3 प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढुन त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमुद असलेली आवश्यक ती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहिल. सदरच्या 3 प्रतिपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडुन परत मिळेल, त्यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाची मुळ प्रत उमेवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी सार्वजनिक बांधकाम विभागकडे जमा करावी. सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी घेतली जाणार नाही. बँकेत परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक **08/09/2014** ते दिनांक **24/09/2014** असा आहे. अंतिम दिनांका नंतर बँकेत परिक्षा शुल्क भरणाऱ्या उमेदवारांचाविचार केला जाणार नाही.

3) उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर उमेदवाराला त्याची स्थिती **www.pwddhulecircle.com** या संकेतस्थळावरती पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

4) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वत:चा वापरातील ई-मेल आयडी आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचुक ई-मेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्वत:चा अद्ययावत (Latest) विहीत नमुन्यातील पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन

**www.pwddhulecircle.com** या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

5) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

6) अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी **7776900546/ 47/ 48/ 49** या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**परीक्षा शुल्क**:-

| **अ.क्र** | **पदनाम / संवर्ग** | **खुला प्रवर्ग** | **राखीव प्रवर्ग** |
|---|---|---|---|
| 1 | चौकीदार, कक्षसेवक, सफाई कामगार, स्वच्छक, खानसामा, माळी | 250 | 150 |

**टिप :-**

1. माजी सैनिकांना परिक्षा शुल्क माफ आहे.
2. परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑन लाईन अर्जा सोबत प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.
3. वर दर्शविण्यात आलेले परिक्षा शुल्क हे बँक प्रक्रिया शुल्क वगळुन आहे
4. स्टेट बँक ऑफ इंडिया कडुन रु.60/- इतके बँक प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

**विशेष सूचना :-**

1) सदरची पदे अस्थायी स्वरुपाची असुन शासनाच्या धोरणाअंती उमेदवाराची सेवा एक महिन्याची नोटीस देऊन केव्हाही समाप्त करण्यात येईल.

2) निवड झालेल्या उमेदवाराची नेमणुक झाल्यास नाशिक प्रादेशिक विभागांतर्गत धुळे / नंदुरबार यापैकी कोणत्याही जिल्हयात नियुक्ती देण्यात येईल. तसेच त्यांना जिल्हयात कोठेही बदली वर जावे लागेल.

3) उमेदवारांना सदर भरती विषयी काही तक्रार अथवा अडचणी असल्यास त्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांका पर्यंत सकाळी 11.00 ते 13.00 या वेळेत समक्ष कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे / सदस्य सचिव तथा उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग धुळे बांधकाम भवन, सिव्हिल हॉस्पीटल समोर धुळे यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

4) वरील जाहिरातीत नमुद केलेली रिक्त पदे ही माहे डिसेंबर 2014 पर्यंत रिक्त होणारी असल्याने सदरची पदे जसजशी रिक्त होतील तसे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील. अपात्र ठरलेल्या अर्जदारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

5) महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधन कारक राहतील.

6) शासकीय कर्मचाऱ्यांची बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम 2005 मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यईल. विनिमय व शासकीय कर्तव्ये पास पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2010/प्र.क्र. 2010/10/12 दिनांक 03/06/2011 मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतुदी लागु राहतील.

7) शासन वित्तविभाग निर्णय क्र.अनियो/10/05/126/सेवा-4 दिनांक 31/10/2005 नुसार दिनांक 01/11/2005 रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवाराचा नवीन परिभाषीत

अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहील. तथापी त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से. (निवृत्त वेतन) नियम 1982 व म.ना.से. (निवृत्ती वेतनाचे अशंराशिकरण ) नियम 1984) आणि सघ्या अस्तित्वात अलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

8) शासन सामान्या प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12 दिनांक 28/3/2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12 दिनांक 01/07/2005 नुसार विहीत केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ.ब.क.व ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणुन विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

9) शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांने सहा महिन्याच्या आत वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडुन शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

**10)** शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधीत उमेदवारांची नेमणुक त्याचे पुर्वचरित्र व वर्तवणुक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबुन राहील व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांना सेवेतुन काढुन टाकण्यात येईल.

11) **मागासवर्गीय आरक्षण :-** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) इतर मागास वर्ग, ESBC (मराठा), व विशेष मागास प्रवर्ग- अ (मुस्लिम) या मधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक 31/03/2014 नंतरचे प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) सादर करणे आवश्यक आहे. नियुक्तीनंतर 6 महिन्याचे आत उमेदवारांनी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

12) ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे. अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधीन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहील.

13) **खेळांडुसाठी आरक्षण** :- फक्त अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल केली आहे. क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील प्रमाणपत्र निवडीनंतर नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

14) **भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण** :- हे आरक्षण कनिष्ठ अभियंता गट-ब (अराजपत्रित) यांना लागु नाही. उर्वरित गट-ड च्या पदांना ते लागु आहे. सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्रा सादर करणे आवश्यक आहे.

15) **शासकीय व निमशासकीय कर्मचारी** :- त्यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहीत मार्गाने विहीत मुदतीत भरावे. परवानगीची प्रत, कागदपत्रे छाननीच्यावेळी सादर करावी.

16) **महिलांसाठी आरक्षण** :- आरक्षणाची मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दि.31/3/2014 नंतरचे प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावे.

17) **अंशकालीन उमेदवार** :- सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत तीन वर्ष दरमहा मानधनावर अंशकालीन काम केलेल्या पदवीधर / पदवीधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी आवश्यक असुन तशी नोंद ऑनलाईन अर्जात करावी. सदर प्रमाणपत्रा व नोंदणीचे प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावे.

18) **माजी सैनिकांसाठी आरक्षण** :- सशस्त्र दलात किमान 6 महिने सेवा केलेल्या माजी सैनिक / राजाधिष्ठ अधिकाऱ्यांना सैन्यातील कालावधी अधिक तीन वर्षे इतकी कमाल वयाची सवलत नियुक्तीसाठी देण्यात येईल म्हणजेच त्यांच्या वयातुन सैनिकी सेवेचा

कालावधी कमी केल्यावर परिणामभुत वय हे विहीत वयोमर्यादेपेक्षा तीन वर्षाहुन अधिक असावे.

19) **अपंग :-** लेखी परिक्षेच्या वेळेस अपंग उमेदवारास लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज करतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा व परीक्षा शुल्क रु.100/- अतिरीक्त भरणा करावे. ऐनवेळी लेखनिक पुरविला जाणार नाही.

20) पदभरतीच्या अधिसुचना, शासन निर्णय व परिपत्रके आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या अधिक.त संकेतस्थळावरुन उमेदवाराने स्वत: उपलब्ध करुन घ्यावीत.

21) या उपरोक्त जाहिरातीतील पदांच्या परिक्षेच्या अनुषंगाने निर्माण होणारे सर्व अभिलेख व कागदपत्रो माहिती अधिकार नियम 2005 अन्वये ही जाहिरात प्रसिद्‌ध झाल्यापासुन एक वर्षे जतन केले जातील व तदनंतर सक्षम प्राधिकार वापरुन ही कागदपत्रे व अभिलेख नष्ट करण्यात येतील, तदनंतर माहितीच्या अधिकारात ही कागदपत्रो उपलब्ध करुन देता येणार नाही.

स्थळ :- धुळे

**सही /-**
**सदस्य सचिव तथा**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, धुळे**